ISSN 2349-638x

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-XII DEC. 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - II | Issue -XII | DECEMBER | 2015 | Monthly | ISSN 2349-638X

# मार्लेश्वर येथिल पर्यटकांच्या समाधान पातळीचा भौगोलिक अभ्यास

**सरदार पाटील,**
सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख,
आठल्ये–सप्रे– पित्रे महाविद्यालय देवरूख,
भूगोलशास्त्र विभाग,
ता. संगमेश्वर. जि. रत्नागिरी

**प्रताप प्र. जाधव व**
**उमेश धुमाळ**
भूगोलशास्त्र विभाग,
आठल्ये–सप्रे– पित्रे महाविद्यालय देवरूख,
ता. संगमेश्वर. जि. रत्नागिरी

**सारांश**

पर्यटन उद्योग हा एकविसाव्या शतकातील एक महत्वपुर्ण उद्योग आहे. भारतासारख्या विकसनशिल देशात पर्यटन उद्योगातून मोठया प्रमाणात रोजगार निर्मितीची संधी उपलब्ध आहे. भारताप्रमाणेच महाराष्ट्रातदेखिल पर्यटन विकास महामंडळाने २०११ हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून घोषित केलेले आहे. महाराष्ट्रातील कोकाण प्रदेश हा जैविक विविधतेने नटलेला. भौगोलिक विविधता असणारा आणि ऐतिहासिक महत्व असणारा समृध्द प्रदेश आहे. कोकणामध्ये पर्यटनाच्या मोठया प्रमाणात संधी असताना देखील परदेशी तसेच देशांतर्गत पर्यटक गोवा या ठिकाणाकडे आकर्षित होतात. त्यामुळेच प्रस्तुतच्या माध्यमातून शोधुन काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुतच्या शोधनिबंध हे पुर्णत: प्राथमिक आकडेवारी आधारीत असून संबंधीत माहिती क्षेत्र भेटीच्या माध्यमातुन यादृच्छिक नमुना पाहणी पध्दतीने संकलित केलेली आहे. त्यासाठी प्रश्नावलीच्या सहय्याने १५० पर्यटकांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

प्रस्तुतच्या अभ्यासावरून असे दिसुन येते की, मार्लेश्वर या ठिकाणी येणारे पर्यटक मूलभूत सेवासुविधांच्या अनुषंगाने असमाधानी आहेत तर येथिल नैसर्गिक सौंदर्याविषयी समाधानी आहेत. अभ्यास क्षेत्राचा विकास करण्यासाठी वाहतुक व्यवस्था, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था इत्यादीच्या विकासावर भर दिला पाहिजे. शिवाय उत्तम मार्गदर्शक देखिल उपलब्ध झाले पाहिजेत.

**प्रस्तावना :**

पर्यटन म्हणजेक इंग्रजी मध्ये पवास आणि फ्रेंच मध्ये भटकंती होय. पर्यटन म्हणजे लोकांनी आपल्या निवास्थानापासून तात्पुरत्या स्वरूपाचे मानसिक समाधानासाठी केलेले स्थलांतर होय. पर्यटनाला व्यापार, शिक्षण, धर्म, आरोग्य व नातवाईक पर्यटनासाठी प्रोत्साहन करत असतात. धार्मिक पर्यटन व शैक्षणिक पर्यटन इ. पर्यटनाचे ढोबळमानाने वर्गीकरण केले जाते. धार्मिक पर्यटनामध्ये लोक आप्तेष्टांसमवेत किंवा यात्रेकरूबरोबर फिरतात. (घारपुरे,२००३).

पर्यटन उद्योग हा एकविसाव्या शतकातील एक महत्वपूर्ण उद्योग आहे. भारतासारख्या विकसनशील देशात पर्यटन व्यवसायातील आवश्यक असणारी संधी उपलब्ध आहे. भारताप्रमाणे महाराष्ट्रात देखील पर्यटन व्यवसायासाठी आवश्यक असणारी पार्श्वभूमी उपलब्ध असल्याने महाराष्ट्रात पर्यटन विकास महामंडळाने (MTDC) २०११ हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून घोषीत केले आहे.(MTDC 2010) महाराष्ट्रातील सर्वात महत्वाचा प्रदेश म्हणून कोकण प्रसिध्द आहे.कोकण प्रदेश हा जैविक विविधतेने नटलेला, भौगोलिक विविधता असणारा, ऐतिहासिक महत्व असलेला समृध्द प्रदेश आहे. कोकाणात

पर्यटनाच्या मोठया प्रमाणात संधी उपलब्ध असताना देखिल परदेशी तसेच देशांतर्गत पर्यटक गोवा या ठिकाणाकडे आकर्षित होतात. याचे मुख्य कारण कोकणात पायाभुत सेवासुविधांचा विकास इतर राज्यांशी तुलना करता कमी प्रमाणात झालेला आहे. त्यामुळेच प्रस्तूतच्या शोधनिबंधात कोकणात येणाऱ्या पर्यटकांचा समाधान निर्देशांक, मार्लेश्वर या ठिकाणच्या अभ्यासाच्या माध्यमातुन शोधातून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

## २.० अभ्यास क्षेत्र

सदरच्या शोधनिबंधसाठी रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील मार्लेश्वर हे ठिकाण अभ्यासक्षेत्र म्हणून निवडण्यात आलेले आहे. या ठिकणचे अक्षवृत्तीय अंतर हे १७°१४' २८.६८" उत्तर इतके असुन रेखावृत्तीय अंतर हे ७३° ४४' १०.८०" पूर्व इतके आहे. मार्लेश्वर या ठिकाणाची समुद्रसपाटीपासुनची उंची १२०९ फुट इतकी असून या ठिकाणचे वार्षिक सरासरी तापमान २२.५ अंश से. इतके आहे. संमेश्वर तालुक्याच्या पूर्वभागात सहयाद्री पर्वताच्या पायथ्याजवळ मार्लेश्वर हे ठिकाण वसलेले आहे. रत्नागिरी या शहरापासून मार्लेश्वर हे ठिकाण ६८ कि. मी. अंतरावर आहे. तसेच हे ठिकाण कोल्हापूर, सांगली आणि रत्नागिरी जिल्हयांच्या सिमावर्ती भागात स्थानांकित झालेले आहे. मार्लेश्वर यथिल धारेश्वर हा धबधबा २०० फुट उंचीचा असुन याच ठिकाणापासुन बावनदीचा उगम झालेला आहे.




## ३.० उदिष्टे :

कोकणात येणाऱ्या पर्यटकांनी समाधान पातळी मार्लेश्वर या ठिकाणच्या अभ्यासाच्या तसेच सर्वेक्षणाच्या माध्यमातून शोधातून शोधून काढणे हा सदरच्या शोधनिबंधाचा मुख्य हेतू असून सदरच्या शोधनिबंधाची इतर काही उदिष्टे खालीलप्रमाणे:

१. मार्लेश्वर या ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांची समाधान पातळी अभ्यासणे.
२. पर्यटकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
३. अभ्यास क्षेत्राचा विकास करण्यासाठी उपायसयोजना सूचविणे.

### ४.० अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंध हा पुर्णत: प्राथमिक आकडेवरीवर आधारीत असून संबंधित माहिती ही क्षेत्रभेटीच्या माध्यमातून यादृच्छिक नमुना पाहणी पध्दतीने संकलित केली आहे. त्यासाठी प्रश्नावलीच्या सहाय्याने एकूण १५० पर्यटकांची प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात आलेली आहे. मुलाखतीबरोबराच निरीक्षण पध्दतीचा देखिल वापर माहितीच्या संकलनासाठी करण्यात आलेला आहे. मार्लेश्वर येथिल पर्यटकांच्या समाधानाचा अभ्यास करण्यासाठी प्रात्यक्षिक (Empirical) पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. माहितीच्या संकलनानंतर तिच्यावर पृथकरण करून कोष्टक रूपाने आकडेवारीची मांडणी केलेली आहे. अभ्यासक्षेत्राचा नकाशा तयार करण्यासाठी ग्लोबल मॅपर या सॉफ्टवेअरचा वार करण्यात आलेला आहे.

### ५.० विश्लेषण

#### मार्लेश्वर एक धार्मिक पर्यटन क्षेत्र

महाराष्ट्रातील कोकण विभाग हा निसर्गसौंदर्याने तसेच जैवविविधतेच्या दृष्टीने अतिशय समृध्द असा प्रदेश आहे. रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुका हा पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा समजला जातो. संगमेश्वर तालुक्यामध्ये विविध पर्यटन स्थळे आढळतात त्यामध्ये विविध किल्ले, पुरातन मंदिरे, गुहा, स्मारके, निसर्गरम्य धबधबे, नदया इत्यादीचा समावेश होतो. त्या स्थळांमधीलच अतिशय महत्वाचे पर्यटन स्थळ म्हणजे श्री क्षेत्र मार्लेश्वर हे ठिकाण संगमेश्वर तालुक्याच्या पूर्व भागात व सह्याद्री पर्वतांच्या पायथ्याच्या जवळ वसलेले आहे. मार्लेश्वर हे शंकर देवाचे स्वयंभू व जागृत देवस्थान आहे. अतिशय निसर्गरम्य परिसर व सर्वत्र शांत वातावरण आरोग्यदायी हवामान इत्यादी गुणांशिवाय सह्याद्री पर्वाताच्या कड्या–कपारीतुन कोसळणारा धबधबा हा पर्यटकांना आकर्षित करतो. हा धबधबा सुमारे २०० फुट उंची वरून खाली कोसळणारा धबधबा असून यास धारेश्वर असे म्हणतात.या धबधब्यापासूनच बावननदीचा उगम होवून ही बावन नदी अरबी समुद्राला जावुन मिळते. संगमेश्वर तालुक्यातील सर्वात महत्वाचे ठिकाण म्हणजे देवरूख या गावापासून अवघ्या २५ किमी अंतरावर हे अतिशय पवित्र जागृत देवस्थान आहे. अतिशय प्राचीन देवस्थानापैकी एक म्हणून मार्लेश्वरला ओळखले जाते. मार्लेश्वर मंदिर हे गुंहेमध्ये असून त्याला देवळाचा गाभारा असे म्हणतात. ही गुहा कठिण काळया दगडामध्ये डोंगरात कोरलेली असून ती सुरक्षित ठिकाणी आहे. गुहेंचे प्रवेशद्वार हे चौकोनी आकाराचे अतिशय लहान असून एकावेळी एकच व्यक्ती प्रवेयशद्वारातुन ये जा करू शकतो. साधरणत: हे प्रवेशद्वार ३ फुट उचीचे आहे हे मंदिर अतिशय पुरातन असून ती एक प्रकारची गुहा आहे गाभाऱ्यामध्ये अनेक प्रकाचे विषारी साप मुक्तपणे संचार करतात तो साप ज्या व्यक्तला दिसेल तो भाग्यवान आहे. अशी भाविकांमध्ये श्रध्दा आहे.

मार्लेश्वरच्या धारेश्वर धबधब्याखाली जाण्यासाठी मंदिरापासून १० मिनिटांचा वेळ लागतो. धारेश्वर धबधब्याच्या थंड पाण्याने स्नान करून मगच देवदर्शन घेणे ही तेथिल पारंपारीक प्रथा आहे. हे पाणी अतिशय थंड असून ते बारमाही स्वरूपाचे आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी तसेच श्रावण सोमवार यावेळी पर्यटकांची तसेच भाविकांची मोठया प्रमाणत गर्दी असते. मकर संक्रातीच्या दिवशी श्री मार्लेश्वर या ठिकाणी सर्वात मोठा उत्सव साजरा केला जातो. मार्लेश्वर मंदिरापर्यत जाण्यासाठी सुमारे ५५० पायऱ्या चढाव्या लागतात.

#### मार्लेश्वर येथील उत्सवाची पारंपरीक पध्दत:

मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी मार्लेश्वर पालखी आंगवली गावातून रात्रौ १२. ०० वा. बाहेर पडून फक्त मशालीच्या उजेडावर ती पाहटे मार्लेश्वर या ठिकाणी पोहचते. संक्रांतीच्या दिवशी श्री मार्लेश्वर देवाचा लग्न सोहळा मोठया थाटामाटात पारंपारीक पध्दतीने साजरा केला जातो. मार्लेश्वर देवाचे लग्न हे साखरपा येथिल गिरीजादेवीशी लागते. या लग्नसोळयाचे यजमानी हे देवरूखातील श्री व्याडेश्वर देव असतात. या लग्नसोहळयासाठी अनेक पालख्या व दिडया या

ठिकाणी येतात. या दिडयाच श्री मार्लेश्वराच्या करवल्या होतात. लांजा, देवरूख, इत्यादी शहरांमधून या दिंडया पायी येतात हा लग्न सोहळा दरवर्षी रितिरिवाजानुसार पार पाडला जातो.

### समाधान पातळीचे विश्लेषण :

पर्यटन उद्योगाचा विकास होण्यासाठी पर्यटकांचे समाधान या घटकाला अनन्य साधारण महत्व आहे. कारण समाधानी पर्यटक हे पर्यटन ठिकाणाची प्रसिध्दी करतात तर असमाधानी पर्यटक हे पर्यटन ठिकाणचा अपप्रचार करतात. मार्लेश्वर या ठिकाणी भेट देणारे पर्यटक निवास व्यवस्था, मनोरंजन सुविधा, भोजन व्यवस्था, पोलिस सुरक्षा, वैदयकिय सुविधा, मार्गदर्शक, आणि स्नान करण्याची सोय या विषयी पर्यटक पूर्ण असमाधानी आहेत. तर दर्शन सुविधा, स्थानिकांचे सहकार्य पुजाऱ्यांचे सहकार्य, पिण्याच्या पाण्याची सोय, पार्किंग व्यवस्था आणि खरेदी सुविधा या विषयी पर्यटक काही अंशी समाधानी आहेत. निसर्ग सौंदर्याचा विचार करता पर्यटक पूर्ण समाधानी आहेत.

**कोष्टक –१**

**विविध घटकानुसार समाधानाची पातळी**

| अ.क्र. | स्वा सुविधा | अति चांगले | चांगल्या | समाधान कारक | असमाधान कारक | एकूण पर्यटक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | निवास व्यवस्था | .... | ... | .... | १५० | १५० |
| २. | दर्शन व्यवस्था | ५० | २५ | ५० | २५ | १५० |
| ३. | स्थानिकांचे सहकार्य | २५ | २५ | ५० | ५० | १५० |
| ४. | पुजाऱ्याचे सहकार्य | ५० | २५ | ५० | २५ | १५० |
| ५. | मनोरंजन सुविधा | ..... | ..... | ..... | १५० | १५० |
| ६. | भोजन व्यवस्था | ..... | ..... | ५० | १०० | १५० |
| ७. | पिण्याच्या पाण्यारची सोय | २५ | २५ | ५० | ५० | १५० |
| ८. | प्रसाधन गृहाची सुविधा | .... | .... | ५० | १०० | १५० |
| ९. | पार्किंग व्यवस्था | ०५ | ३० | ४५ | ७० | १५० |
| १०. | पेलिस सुरक्षा | .... | ... | ..... | १५० | १५० |
| ११. | वैयक्तीक सुरक्षितता | .... | २५ | २५ | १०० | १५० |
| १२. | वैदयकिय सुविधा | .... | .... | .... | १५० | १५० |
| १३. | खरेदी सुविधा | २५ | २५ | ५० | ५० | १५० |
| १४. | मार्गदर्शक | .... | .... | .... | १५० | १५० |
| १५. | स्नान करण्याची सोय | .... | .... | .... | १५० | १५० |
| १६. | निसर्ग सौंदर्य | १५० | .... | .... | .... | १५० |

संदर्भ : क्षेत्र भेट

### मार्लेश्वर येथिल समस्या/अडचणी

१. अभ्यास क्षेत्रामध्ये पर्यटकांसाठी निवासाची सोय नाही.
२. स्वच्छतागृहे ही मोजकेच असून त्यामध्ये अस्वच्छता मोठया प्रमाणात आहे.
३. अभ्यास क्षेत्राची माहिती सांगण्यासाठी मार्गदर्शकांचा अभाव आहे.
४. पार्किंगसाठी जागा कमी प्रमाणात उपलब्ध असून अस्तित्वात असणाऱ्या जागेचे नियोजनाचा अभाव आहे.
५. श्री क्षेत्र मार्लेश्वर या ठिकाणी चांगल्या प्रतीचे हॉटेल्स नाहीत शिवाय हॉटेलमधील खादयपदार्थ हे उघडयावरचे असून अस्वच्छता जास्त असते.

६. मार्लेश्वर येथे जाण्यासाठी ठराविकच बसेस उपलब्ध असून खाजगी वाहतुक व्यवस्था उपलब्ध नाही. शिवाय देवरूख – मार्लेश्वर रस्ता अरूंद आहे.
७. पिण्याचे पाणी असून पाणपोईचा अभाव आहे.
८. चांगल्रू प्रतीच्या जेवणाची सोय नाही शिवाय उपलब्ध असणाऱ्या खादयपदार्थांच्या किंमती तुलनेने अधिक आहेत.

**कोष्टक क्र २**
**विविध खाद्यपदार्थांच्या किंमती**

| अ. क्र. | खाद्यपदार्थ | मार्लेश्वर येथील किंमत | देवरूख येथील किंमत |
|---|---|---|---|
| १ | वडा पाव | रू. ०१० | रू. ०७ |
| २ | मिसळ पाव | रू. १५ | रू.१० |
| ३ | कट वडा | रू. १५ | रू. १० |
| ४ | कांदा भजी | रू. १२ | रू. ०८ |
| ५ | साधा चहा | रू. १० | रू. ०७ |
| ६ | स्पेशल चहा | रू. १५ | रू. १० |
| ७ | पाणी बॉटल | रू. २२ | रू. १६ |
| ८ | पाव भाजी | रू. ३० | रू. २५ |

## ६.० सारांश आणि उपाययोजना :

प्रस्तुतच्या शोधनिबंधाच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, मार्लेश्वर या ठिकाणी येणारे पर्यटक मुलभूत सेवासुविधाच्या अनुषंगाने असमाधनी असून तेथील नैसर्गिक सौदर्याविषयी पूर्ण समाधानी आहेत. अभ्यासक्षेत्राचा विकास करण्यासाठी वाहतुक व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, निवास व्यवस्था, प्रसाधानगृहाची सोय , भोजन व्यवस्था इत्यादी मुलभूत सेवासुविधांच्या विकासावर भर दिला पाहिजे शिवाय उत्तम मार्गदर्शक देखिल उपलब्ध झाले पाहिजेत. थोडक्यात मार्लेश्वर येथिल पर्यटन विकासाच्या दृष्टीने तेथिल मुलभुत सेवासुविधांच्या विकासावर भर दिल्यास तेथिल पर्यटनाचा शाश्वत विकास होवू शकतो.

## संदर्भ सुची :

http/www.mtdc.gov.in Batra, K.L. ( 1989) : " Problems and Prospects of tourism", Printwell Publishers , Jaipur - 302 004
Bhatia A.K. ( 1982): "tourism development, principles and practices", sterling Publishers private ltd. New Delhi- 110 016
Bhatt Harish & Badan B.S. ( 2006): " Sustainable tourism". Crescent Publishing Corporation, New Delhi – 110 002
Chawala, Romila (2006): " Agri Toursim". Sonali Publications. New Delhi -100 002
Kapoor, Rakesh (1997): " tourism policy organization and management", Kanishka Publishers Distributor, New Delhi 110002
Malhortra, K.C. ( 1992): " Tourism today", Kanishka Publishing house, Delhi 110053
Selvam, M. (1989) : " Tourism Industry in India" Himalaya Publishing House, Bombay -400 004
घारपुरे, विठ्ठल (२००३): पर्यटन भूगोल, पिंपळापुरे आणि कं. पब्लिशर्स, नागपूर.
घाणेकर, प्र. के. () : कोकाणातील पर्यटन
www.earthgoogle.com